# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०१.११.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—** मा. पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ३१/१०/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३३३ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन १,९८,१००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.३१/१०/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयात एकुण ३४ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ९७.९२ लिटर दारू असा एकुण ७५,७६०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त तसेच नाश करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि.३१/१०/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे कुरूंदा येथे ०१ तसेच पोस्टे हटटा ०१ अशा एकुण ०२ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण २,०५०/—रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**चोरी :—**दिनांक ३१/१०/२०२२ रोजी फिर्यादी भगवान हनुमंतराव शेळके रा.शेळके पोटा ता.औंढा ना. जि.हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हटटा येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि. ३०.१०.२२ रोजी चे १६:०० वा चे सुमारास मौजे जवळा बाजार येथील लकडोबा मंदिराचे बाजुला रोडच्या कडेला अज्ञात चोरटयांनी फिर्यादीची हिरो होंन्डा स्प्लेंडर कंपणीची पांढरे पट्े असलेले मो.सा.क्र एम.एच.३८ टि.२०६० कि.५०,००० रू हि मौजे जवळा बाजार येथुन अज्ञात चोरटयांनी चोरून नेली म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हटटा पोलीस तपास करित आहेत.

दिनांक ३१/१०/२०२२ रोजी फिर्यादी सुधाकर शेषराव गारूळे रा.साईनगर कळमनुरी ह.मु. तिवरी ता.डिग्रस जि.यवतमाळ यांचे फिर्यादी वरून पोस्टे कळमनुरी येथे कलम ३९२,३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.३१.१०.२२ रोजीचे १९:०० वा चे सुमारास शिवनी खु गावाजवळील दोन नंबरचे गती रोधक जवळ दोन अज्ञात इसमांने फिर्यादी चालवित असलेले मोटार सायकल गतीरोधक वर हळु झाल्याचा फायदा घेवुन पाठीमागे बसलेल्या फिर्यादीच्या पत्नीच्या खांदयाला अटकवलेली पर्स ज्या मध्ये सोन्या चांदीचे दागीने व मोबाईल असा एकुण ३,६८,००० रू मुद्देमाल हिसकावुन घेवुन पळुन गेले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात कळमनुरी पोलीस तपास करित आहेत.